**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१

दूरध्वनी क्र ०२२-२२८३०२०० **Email ID :** soyoj6.rdd-mh@nic.in


**क्रमांक: विकास-२०२४/प्र.क्र.११०/यो-६** **दिनांक : १७ मार्च, २०२५**

**प्रति,**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

२) अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ (सर्व).

**विषय :** लेखाशिर्ष २५१५-१२३८ व लेखाशिर्ष ३०५४-२४१९ अंतर्गत सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील मंजूर कामांची देयके LPRS प्रणालीवर सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

**संदर्भ :** शासन सम क्रमांकाचे दि.१० जून, २०२४ व दि.११ डिसेंबर, २०२५ रोजीची पत्र

**महोदय/महोदया,**

मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे (लेखाशिर्ष २५१५-१२३८) व जिल्हा परिषदेंतर्गत रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (लेखाशिर्ष ३०५४-२४१९) या योजनांतर्गत अनुक्रमे गावातील मुलभुत विकास कामांना व ग्रामीण रस्ते/पूल दुरुस्ती कामांना शासन मान्यतेने मंजूरी दिली जाते. सदर कामांची देयके अदा करण्यासाठी सन २०१९-२० पासून LPRS प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सदर कामे पूर्ण करुन त्यांची देयके LPRS प्रणालीवर सादर करण्यासाठी कामे ज्या आर्थिक वर्षात मंजूर केले जातात, त्या आर्थिक वर्षाच्या लगतच्या पुढील आर्थिक वर्षापर्यंतच Upload करता येते. यामुळे सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात प्रशासकीय मान्यता दिलेल्या ज्या कामांचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत, अशी कामे प्रथम स्थगित व त्यानंतर रद्द करण्यात आली होती. तद्नंतर अशी कामे रद्द यादीतून वगळण्यात आल्यामुळे अशी कामे विहित मुदतीत पूर्ण न होणे, स्थानिक व तांत्रिक इ. अडचणींमुळे LPRS प्रणालीवर काही कामांची देयके विहीत मुदतीत सादर करता येत नसल्यामुळे अशा कामांची देयके सादर करण्यास मुदतवाढ देण्याचे प्रस्ताव शासनास सादर होत आहेत. त्यानुसार संदर्भाधीन पत्रान्वये सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील ज्या मंजूर कामांचे विहीत मुदतीत कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत, केवळ अशा कामांची देयके LPRS प्रणालीवर सादर करण्यासाठी दि.२८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

तथापि, अद्यापही सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील बहुतांशी मंजूर कामांची देयके LPRS प्रणालीवर सादर करण्यात आलेली नसल्याने व दि.२८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत

देयके सादर करण्याचा कालावधीही संपूष्टात आलेला असल्याने सदर कामांना मुदतवाढ देण्याची काही जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभाग यंत्रणांनी मागणी केली आहे.

२. त्यानुषंगाने, **ज्या मंजूर कामांचे विहीत मुदतीत कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत,** केवळ अशा कामांना खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | प्रशासकीय मंजूरीचे वर्ष | कार्यारंभ आदेश निर्गमित करण्याची मुदत | मुदतवाढीबाबतचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | २०२१-२२ | १) दि.३१ मार्च, २०२३ (रद्द यादीत नसलेल्या कामांबाबत) व<br>२) दि.३१ मार्च, २०२४ (रद्द यादीतून वगळलेल्या कामांबाबत) | १) सन २०२१-२२ मधील रद्द यादीत नसलेल्या ज्या मंजूर कामांचे कार्यारंभ आदेश विहित वेळेत म्हणजेच दि.३१ मार्च, २०२३ पूर्वी निर्गमित करण्यात आलेले आहेत व जी कामे पूर्ण अथवा प्रगतीपथावर आहेत, अशा कामांना व<br>२) सन २०२१-२२ मधील रद्द यादीतून वगळलेल्या ज्या कामांचे कार्यारंभ आदेश विहित वेळेत म्हणजेच दि.३१ मार्च, २०२४ पूर्वी निर्गमित करण्यात आलेले आहेत, केवळ अशा कामांची देयके LPRS प्रणालीवर सादर करण्यासाठी २ महिन्यांची म्हणजे **<u>दि.३० एप्रिल, २०२५ पर्यंत</u>** मुदतवाढ देण्यात येत आहे. |
| २ | २०२२-२३ | दि.३१ मार्च, २०२४ | सदर आर्थिक वर्षातील ज्या कामांचे कार्यारंभ आदेश विहित वेळेत म्हणजेच दि.३१ मार्च, २०२४ पूर्वी निर्गमित करण्यात आलेले आहेत, केवळ अशा कामांची देयके LPRS प्रणालीवर सादर करण्यासाठी २ महिन्यांची म्हणजेच **<u>दि.३० एप्रिल, २०२५ पर्यंत</u>** मुदतवाढ देण्यात येत आहे. |

वरील परि.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन २०२१-२२ व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील **ज्या मंजूर कामांचे विहीत मुदतीत कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत, केवळ अशाच कामांची देयके सादर करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. <u>तरी जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम मंडळ यांनी विहीत मुदतीत सदर कामे पूर्ण करुन देयके LPRS प्रणालीवर दि.३० एप्रिल, २०२५ पर्यंत सादर करण्याची दक्षता घ्यावी.</u>**

आपला,

**(का.गो.वळवी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-**

१) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
३) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद (सर्व),
४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (सर्व).

**प्रत:-** कार्यासन अधिकारी (बांधकाम-३), ग्राम विकास विभाग